# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २२/०९/२०२२

## लाच स्वीकारले प्रकरणी तलाठ्यास शिक्षा

---

खरेदी केलेल्या जमिनीची सातबारा उता-यावर नोंद करणेसाठी १५००/- रूपयांची लाच मागणी करून स्वीकारले प्रकरणी आरोपी लोकसेवक सीमा सुभाष कांबळे, तलाठी, सजा - सारोळा, ता. भोर, जि. पुणे यांचेवर दि.१६/११/२०१५ रोजी राजगड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नं. ९४/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे युनिटचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अरूण घोडके यांनी करून विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

दि. २२/०९/२०२२ रोजी मा. विशेष न्यायाधीश श्री.पी.पी.जाधव, विशेष न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी सदर खटल्यामध्ये न्यायनिर्णय देवून त्यामध्ये आरोपी लोकसेवक सीमा सुभाष कांबळे, तलाठी, सजा - सारोळा, ता. भोर, जि. पुणे याना भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कायदा कलम ७, १३ अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास व १ लाख रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारतर्फे सदर खटल्याचे कामकाज विशेष सरकारी अभियोक्ता श्री. प्रेमकुमार अगरवाल व श्री. चंद्रकिरण साळवी यांनी पाहिले. त्यांना अभियोग कामकाजामध्ये पैरवी पोलीस नाईक जगदिश कस्तुरे व पोलीस हवालदार अतुल फरांदे यांनी मदत केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.